# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## मराठी विभाग

प्रभात पुणे, बुधवार, दि. ४ जानेवारी २०१७ ०५

# प्रबोधन चळवळीत सावित्रीबाईंचे योगदान

## डॉ. संजय शिंदे : राजगुरुनगर येथे जयंतीदिनी विविध कार्यक्रम



राजगुरुनगर : येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. संजय शिंदे. सोबत अन्य मान्यवर.

राजगुरुनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात बहुजन समाजाचा आणि खास करून स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी तन-मन-धन अर्पून कार्य करणाऱ्या पहिल्या महिला सुधारक म्हणून सावित्रीबाईंचे प्रबोधनाच्या चळवळीत महत्वाचे योगदान असल्याचे प्रतिपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

महात्मा फुले समाज विकास प्रतिष्ठान व ज्योती आवाज पतसंस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना नेत्या विजयाताई शिंदे होत्या.

या प्रसंगी उपनगराध्यक्षा सारिका घुमटकर, पंचायत समिती सदस्या अमृता गुरव, शांताराम बापू घुमटकर, शांताराम नथू घुमटकर, ज. र. शिंदे, प्रा. विष्णू लडकत, अनिल कहाणे, शोभाताई शेवकरी, माजी सरपंच सांगडेताई उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. संजय शिंदे म्हणाले, सावित्रीबाई या भारतातील पहिल्या एतद्देशीय शिक्षिका, बहुजन चळवळीच्या नेत्या, प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या, संवेदनशील कवयत्री, महात्मा फुले यांच्या बरोबरीने काम करणाऱ्या कार्यकर्त्या अशी त्यांच्या व्यक्तिमत्वाची अनेक रूपे उलगडून दाखविली. सावित्रीबाईंनी स्त्रियांना शिक्षण देऊन वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या शुद्रातिशुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखविला, असे सांगून सावित्रीबाईंच्या सामाजिक योगदानाची चर्चा केली. अनाथ मुलांसाठी वसतिगृह, गोरगरिबांसाठी अन्नदान, बालविवाहाला विरोध, विधवांचे विवाह समारंभपूर्वक घडवून आणले, हुंड्याशिवाय कमी खर्चातील सत्यशोधक विवाहपद्धती सुरू केली, विधवांच्या केशवपनाविरुद्ध नाभिकांचा संप घडवून आणले [illegible] बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करून विधवांची बाळंतपणे आपल्या घरी आईच्या ममतेने केली, विधवेचा मुलगा दत्तक घेऊन त्याला डॉक्टर केले. तसेच [illegible] त्यांनी दिलेली साथही तितकीच महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. फुले दांपत्याने स्त्री पुरुष समतेचा आणि शांततामय सहजीवनाचा घालून दिलेला आदर्श कालातीत आहे असे सांगून सावित्रीबाईंनी आपल्या कार्यातून सर्व समाजाला दिलेली माणुसकीची शिकवण सर्वांनी अंगिकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सावित्रीबाई फुले कन्या शाळेतील मुलींचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज. र. शिंदे यांनी केले.

# सावित्रीबाईंचे प्रबोधनाच्या चळवळीत महत्त्वाचे योगदान : डॉ. संजय शिंदे

**राजगुरुनगर, प्रतिनिधी :** अर्वाचीन महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात बहुजन समाजाच्या आणि खास करून स्त्रियांच्या सर्वांगीण उध्दारासाठी तन-मन-धनाने कार्य करणाऱ्या महिला सुधारक म्हणून सावित्रीबाईंचे प्रबोधनाच्या चळवळीत महत्त्वाचे योगदान असल्याचे प्रतिपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

महात्मा फुले समाज विकास प्रतिष्ठान व ज्योती आवाज पतसंस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हा महिला आघाडी प्रमुख विजयाताई शिंदे होत्या. या प्रसंगी उपनगराध्यक्षा सारिका घुमटकर, पं.स.सदस्या अमृता गुरव, शांताराम घुमटकर, प्रा. विष्णू लडकत, अनिल कहाणे, शोभाताई शेवकरी, माजी सरपंच सांगडे उपस्थित होते.

डॉ. शिंदे पुढे बोलताना सावित्रीबाई या भारतातील एतद्देशीय शिक्षिका, बहुजन चळवळीच्या नेत्या, प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या, संवेदनशील कवयत्री, महात्मा फुले यांच्या बरोबरीने काम करणाऱ्या कार्यकर्त्या अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक रुपे उलगडून दाखविली. सावित्रीबाईंनी लग्नानंतर शिक्षण घेऊन वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या शुद्रातिशुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखविला असे सांगून सावित्रीबाईंच्या सामाजिक योगदानाची चर्चा केली.

अनाथ मुलांसाठी वसतिगृह, गोरगरिबांसाठी अन्नदान, बालविवाहांना विरोध, विधवांचे विवाह समारंभपूर्वक घडून आणले, हुंड्याशिवाय कमी खर्चातील सत्यशोधक विवाहपध्दती सुरू केली, विधवांच्या केशवपनाविरुध्द नाभिकांचा संप घडवून आणला यांशिवाय बालहत्या प्रतिबंधक

केसरी पुणे, १७ जानेवारी २०१७ ३

# सावित्रीबाईंचे प्रबोधन चळवळीत महत्त्वाचे योगदान

राजगुरुनगर, (वार्ताहर) : अर्वाचीन महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात बहुजन समाजाच्या आणि खास करून स्त्रियांच्या सर्वांगीण उध्दारासाठी तन-मन-धनाने कार्य करणाऱ्या महिला सुधारक म्हणून सावित्रीबाईंचे प्रबोधनाच्या चळवळीत महत्त्वाचे योगदान असल्याचे प्रतिपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

महात्मा फुले समाज विकास प्रतिष्ठान व ज्योती आवाज पतसंस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले या व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हा महिला आघाडी प्रमुख विजयाताई शिंदे होत्या. याप्रसंगी उपनगराध्यक्षा सारिका घुमटकर, पं.स.सदस्या अमृता गुरव, शांताराम घुमटकर, प्रा. विष्णू लडकत, अनिल कहाणे, शोभाताई शेवकरी, माजी सरपंच सांगडे उपस्थित होते.

डॉ. शिंदे यांनी पुढे बोलताना, सावित्रीबाईंच्या शिक्षिका, बहुजन चळवळीच्या नेत्या, प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या, संवेदनशील कवयित्री, महात्मा फुले यांच्या बरोबरीने काम करणाऱ्या कार्यकर्त्या या अशा व्यक्तिमत्त्वाची अनेक रूपे उलगडून दाखविली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख